जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ०९ दिनांक - ०३/०१/२०२४**

सहकारनगर पोलीस स्टेशन,पुणे शहर

## रेकॉर्डवरील फरारी आरोपीस केले जेरबंद

दि.३०/११/२०२३ रोजी गुलमोहर अपार्टमेंट बालाजीनगर धनकवडी,पुणे येथे फिर्यादी महिला हिचे घराचे दार वाजवुन, तिचा विनयभंग करून मारहाण केली त्यानंतर दि.२७/१२/२०२३ रोजी फिर्यादी यांना पुन्हा रस्त्यात आडवुन पुन्हा विनयभंग करून तुझा घरच्यांना बघुन घेतो अशी धमकी दिली असता त्याबाबत आरोपी आशीष उर्फ पंप्या श्रीकृष्ण राख याचेवर **सहकारनगर पोलीस ठाणे येथे गुरनं.३५५/२०२३ भा.द.वि.कलम ३५४,३२३,५०६** प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

दि.०२/०१/२०२४ रोजी सहकारनगर पोलीस स्टेशन तपास पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार असे सहकारनगर पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना,पोलीस अंमलदार,अमोल पवार व निलेश शिवतरे यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की,सदर बालाजीनगर येथे गुन्हयांतील फरार असलेला आरोपी आशीष उर्फ पंप्या श्रीकृष्ण राख हा धारधार हत्यार घेवुन राज लॉन्ड्रीचे पुढे सार्वजनीक रोडवर बालाजीनगर धनकवडी,पुणे येथे काहीतरी गुन्हा करण्याच्या इरादयाने थांबला आहे अशी खात्रीशिर बातमी मिळाली. सदरची बातमी सहकारनगर पोलीस स्टेशन कडिल वरिष्ठांना कळविली असता,त्यांनी लागलीच पो.उपनिरी.राहुल खंडाळे व अंमलदार यांची टीम तयार करुन त्यांना सुचना व मार्गदर्शन करून बातमीचे ठिकाणी जावुन कारवाई करण्याचे आदेश दिले.

त्यानुसार सहकारनगर पोलीस स्टेशन तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी बातमीचे ठिकाणी जावुन छापा टाकुन आरोपीस ताब्यात घेवुन नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव **आशीष उर्फ पंप्या श्रीकृष्ण राख,वय-१९ वर्षे,रा.दत्त कृपा सोसायटी,बालाजीनगर,धनकवडी,पुणे** असे सांगितले त्याची झडती घेता त्याचे कंबरेला एक लोखंडी धारधार हत्यार मिळून आल्याने त्याच्यावर **सहकारनगर पोलीस ठाणे येथे गुरनं.०३/२०२४,भारतीय हत्यारबंदी कायदा कलम ४ सह २५,महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१) १३५** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन,त्याच्याकडे सहकारनगर पोलीस ठाणे येथे गुरनं.३५५/२०२३,भा.द.वि.कलम ३५४,३२३,५०६ दाखल गुन्हयाच्या अनुशंगाने विश्वसात घेवुन चौकशी करता,त्याने सदरचा गुन्हा त्याने केल्याचे कबुल केल्याने त्यास सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

सदर आरोपी याचेवर खुनाचा प्रयत्न,हत्यार बाळगणे अशा प्रकारचे एकुण ०२ गुन्हे बिबवेवाडी पोलीस स्टेशन येथे दाखल आहेत.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशीक विभाग,श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उपायुक्त,परिमंडळ-२,श्रीमती.स्मार्तना पाटील, मा.सहा.पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग,पुणे, श्री. नारायण शिरगावकर, सहकारनगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.सुरेंद्र माळाळे, पोलीस निरीक्षक, (गुन्हे), श्री.संदीप देशमाने यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक,राहुल खंडाळे, सहा.पो.उप.निरी.बापु खुटवड, पोलीस अंमलदार, अमोल पवार, निलेश शिवतारे, बजरंग पवार,सुशांत फरांदे, भुजंग इंगळे,महेश मंडलिक, नवनाथ शिंदे, ,विशाल वाघ,सागर कुंभार,सागर सुतकर यांनी केली आहे.